# पिंपरी-चिंचवड राममय!




|| वर्ष - 7 । अंक - 254 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 23 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# अयोध्या श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा

## »घरोघरी दीपोत्सव : धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा धडाका!

। पिंपरी । महाईन्यूज ।।

**अयोध्येतील श्रीराम मंदिर लोकार्पण दिनाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.घरोघरी रांगोळ्या काढण्यात आल्या. मंदिरांमध्ये पहाटेपासून विविध कार्यक्रम, आरती, भजन, कीर्तन सुरु होते. फुलांनी व पताकांनी मंदिरे सजविण्यात आली होती. सकाळपासूनच भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.**



अनेक लहान मुलांनी श्रीराम, सीता यांची वेशभूषा परिधान केली होती. चिंचवडगावातील प्राचीन श्रीराम मंदिरामध्ये रामलल्ला प्रतिष्ठापनानिमित्त स्कीन लावण्यात आला. त्यावर, अयोध्येतील सोहळा पाहिल्यावर भाविकांनी 'जय श्रीराम'चा जयघोष करत प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतले. एल्प्रो सिटी स्क्वेअर मॉलमध्ये राममंदिर लोकार्पणानिमित्त ११,००१ दिवे लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला.'जय श्रीराम' या शब्दरचनेत दीप प्रज्वलित करण्यात आले.

पिंपळे निलख मधील समस्थ ग्रामस्थ आणि सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'गीत रामायण' हा कार्यक्रम रामाच्या भक्तीची अनुभूती देणारा आहे. ग. दि. माडगूळकर यांच्या दीर्घ तपस्येतून तयार झालेले आणि ज्येष्ठ संगीतकार सुधीर फडके यांनी स्वरसाज चढवलेल्या या रचना स्वर्ग सुखाची ब्रम्हानंदी अनुभूती देणाऱ्या आहेत असे आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी सांगितले.





## कार सेवकांचा सन्मान...

»पिंपरी येथील माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये सकाळी ११ वाजता प्रभू श्री रामांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर पिंपरी गावातील कारसेवक अतुल शिनकर, नंदकुमार सातुर्डेकर, संजय गायखे, अनिल देसले, नंदकुमार बलकवडे, अनिल कारेकर, राजेंद्र कापसे, गिरीश पंचारिया, प्रभाकर गायकवाड, अतुल ब्रम्हे, नवनाथ कल्याणकर यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

> मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्री राम यांच्या मूर्ती प्रतिष्ठापने निमित्त देशभर उत्साह आणि आनंदी वातावरण आहे. अयोध्या मध्ये श्रीरामांची प्रतिष्ठापना व्हावी ही कोट्यावधी भारतीयांची मनोकामना पूर्ण होत आहे. 'गीत रामायण' हा कार्यक्रम रामाच्या भक्तीची अनुभूती देणारा आहे. ग. दि. माडगूळकर यांच्या दीर्घ तपस्येतून तयार झालेले आणि ज्येष्ठ संगीतकार सुधीर फडके यांनी स्वरसाज चढवलेल्या या रचना स्वर्ग सुखाची ब्रम्हानंदी अनुभूती देणाऱ्या आहेत.
>
> **-अश्विनी जगताप,** आमदार, चिंचवड विधानसभा.

## पुनावळेत अध्यात्मिक वातावरण...




»पुनावळे येथे श्रीराम मंदिर ट्रस्टच्या पुढाकाराने काकडा आरती, महापूजा, रामायणाचार्य ह.भ.प. महावीर महाराज सूर्यवंशी यांचे प्रवचन, अयोध्येतील कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण, महिला भजनी मंडळाचे भजन, हरिपाठ, सामुदायिक भजन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रवचनकार यांचा सन्मान भाजपाचे शहर उपाध्यक्ष राहुल काटे, नवनाथ ढवळे, सुरेश रानवडे यांच्याहस्ते करण्यात आला. दिवसभरामध्ये हजारो भक्तांनी मंदिरात दर्शन घेतले. सायंकाळी दीपोत्सव व सामूहिक भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# केंद्र सरकारची नियमावली अन्यायकारक

## शिकवणी चालकांची केंद्र सरकारच्या नियमावलीविरोधात आक्रमक भूमिका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**खासगी शिकवण्यांना नियम असण्याबाबत हरकत नाही. मात्र १६ वर्षांखालील मुलांसाठी शिकवण्याच नकोत हा नियम अन्यायकारक असल्याचे सांगत खासगी शिकवणी चालकांनी केंद्र सरकारच्या नियमावलीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील खासगी शिकवणी चालकांची नाशिक येथे २८ जानेवारीला बैठक होणार आहे.**



केंद्र सरकारच्या नियमावलीच्या नियमावलीविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी करण्यात आली आहे.विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठीच्या शिकवण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच नियमावली जाहीर केली. या नियमावलीनुसार दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वयाची १६ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच आता शिकवणी वर्गाला प्रवेश देता येणार आहे. त्याचबरोबर किमान पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शिक्षक म्हणून नियुक्त करता येईल. त्याचबरोबर प्रत्येक शिकवणी वर्गाने समुपदेशाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शिकवण्यांना १ लाख रुपयांपर्यंत दंड करण्याची किंवा नोंदणी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. पुढील तीन महिन्यांत नव्याने सुरू होणाऱ्या किंवा असलेल्या शिकवण्यांनी नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नोंदणी, पडताळणी, कारवाई आणि एकूण नियमनाची जबाबदारी राज्य शासनांची असेल, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.केंद्र सरकारच्या नियमावलीच्या पार्श्वभूमीवर खासगी शिकवणीचालक आक्रमक झाले आहेत. कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी नियमावलीसाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य बंडोपंत भुयार म्हणाले, की खासगी शिकवण्यांना नियमावली असायला हरकत नाही. पाच राज्यांमध्ये तशी नियमावली आहे. महाराष्ट्रातही २०१८मध्ये समिती नेमण्यात आली होती. मात्र १६ वर्षांखालील मुलांना शिकवणीच नको हा निर्णय अन्यायकारक आहे. ७० टक्के शिकवण्या १६ वर्षांखालील मुलांच्या आहेत. करोना काळात मुलांचे शिक्षण कच्चे राहिले आहे. ते पक्के झाले पाहिजे. असरच्या अहवालानुसार आठवीच्या मुलांना तिसरी-चौथीचे धडे वाचता येत नाहीत. त्यामुळे सरकारनेच शिकवणी वर्ग नको म्हणणे हा विरोधाभास आहे. या निर्णयामुळे शिकवणीचालकांसह पालक विद्यार्थ्यांचेही नुकसान होणार आहे. लाखो सुशिक्षित या क्षेत्रात कार्यरत आहेत. सरकारी नोकऱ्या, नोकरीच्या संधी नाहीत. त्यामुळे या निर्णयामुळे बेरोजगारी वाढेल. कोटासारख्या ठिकाणी विद्यार्थी मानसिक ताणामुळे आत्महत्या करण्याच्या घटना घडत असल्या, तरी तिथे शिकणारी विद्यार्थी १६ वर्षांवरील असतात. त्यामुळे सरकारच्या जाचक नियमावलीला विरोध आहे.नियमावलीच्या अनुषंगाने २८ जानेवारीला राज्यभरातील शिकवणीचालक, संघटनांची नाशिकमध्ये बैठक होणार आहे. त्यात आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल. आवश्यकता भासल्यास न्यायालयात दाद मागितली जाईल, असेही भुयार यांनी स्पष्ट केले.कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी नियमावलीसाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य बंडोपंत भुयार म्हणाले, की खासगी शिकवण्यांना नियमावली असायला हरकत नाही. पाच राज्यांमध्ये तशी नियमावली आहे. महाराष्ट्रातही २०१८मध्ये समिती नेमण्यात आली होती. मात्र १६ वर्षांखालील मुलांना शिकवणीच नको हा निर्णय अन्यायकारक आहे.

### करोनात मुलांचे शिक्षण कच्चे राहिले

» ७० टक्के शिकवण्या १६ वर्षांखालील मुलांच्या आहेत. करोना काळात मुलांचे शिक्षण कच्चे राहिले आहे. ते पक्के झाले पाहिजे. असरच्या अहवालानुसार आठवीच्या मुलांना तिसरी-चौथीचे धडे वाचता येत नाहीत. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या नियमावलीविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठीच्या शिकवण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच नियमावली जाहीर केली. या नियमावलीनुसार दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वयाची १६ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच आता शिकवणी वर्गाला प्रवेश देता येणार आहे. त्याचबरोबर किमान पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शिक्षक म्हणून नियुक्त करता येईल. त्याचबरोबर प्रत्येक शिकवणी वर्गाने समुपदेशाची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

# रामवाडीपर्यंत मेट्रोला लवकरच हिरवा कंदील!

## केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून अंतिम तपासणी पूर्ण

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील विस्तारित सेवा लवकरच सुरू होणार आहे. केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त जनककुमार गर्ग यांनी या मार्गाची अंतिम तपासणी पूर्ण केली आहे. त्यांनी काही किरकोळ त्रुटी दूर करण्याचे निर्देश महामेट्रोला दिले असून, त्यानंतर या मेट्रो सेवेला अंतिम मंजुरी मिळणार आहे.**



रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाची अंतिम तपासणी केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त गर्ग यांनी १९ जानेवारीपासून सुरू केली. त्यांनी ही तपासणी २१ जानेवारीपर्यंत पूर्ण केली. या तपासणीदरम्यान त्यांनी या मार्गातील काही त्रुटी उपस्थित केल्या. या त्रुटी दूर करून महामेट्रो त्याचा अहवाल आयुक्तांना पाठविणार आहे. त्यानंतर या मार्गाला अंतिम मंजुरी मिळणार आहे. आयुक्तांनी या मार्गाला हिरवा कंदील दिल्यानंतर महामेट्रोकडून मार्ग सुरू करण्याबाबत राज्य सरकारशी पत्रव्यवहार केला जाईल.

त्यानंतर राज्य सरकार मार्ग सुरू करण्याची तारीख निश्चित करेल, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली. पक्ष्यांनी मेट्रोचा मार्ग अडविला; ओव्हरहेड केबलला धडकल्याने सेवा अर्धा तास खंडित

रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो तपासणी करण्यासाठी या महिन्यात सुरुवातीला मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त कार्यालयाचे पथक पुण्यात आले होते.

या पथकाने विस्तारित मार्गाची आठवडाभर तपासणी केली होती. या पथकाने काही त्रुटी काढल्या होत्या. त्या त्रुटी मेट्रोकडून दूर करण्यात आल्या होत्या. त्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त गर्ग हे या मार्गाच्या तपासणीसाठी पुण्यात दाखल झाले होते.

> केंद्रीय मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून रुबी हॉल ते रामवाडी मेट्रो मार्गाची अंतिम तपासणी पूर्ण झाली आहे. त्यांनी तपासणीदरम्यान काही किरकोळ त्रुटी काढल्या आहेत. या त्रुटी दूर करून त्याचा अहवाल चार-पाच दिवसांत आयुक्तांना पाठविण्यात येईल. त्यानंतर या मार्गाला अंतिम मंजुरी मिळेल.
>
> **-अतुल गाडगीळ,** संचालक (कार्य), महामेट्रो

## ...अन् पाच लाखाहून अधिक रामभक्तांची रथयात्रा!

# आसमंतात घुमला ‘जय सियाराम’चा नारा!

## हिंदूत्त्ववादी आमदार महेश लांडगे यांचा ‘रेकॉर्ड ब्रेक’ सोहळा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अत्यंत भक्तीमय... भगवामय... आणि मंगलमय वातावरण... फुलांचा वर्षाव अन् ढोल-ताशांच्या निनादामध्ये चौका-चौका होणारे स्वागत... फटाक्यांचे तुफान आतिषबाजी आणि ‘जय सियाराम’ चा गगणभेदी नारा... अशा उत्साहाच्या आणि भक्ती-भावाच्या वातावरणात तब्बल ५ लाख हून अधिक पिंपरी-चिंचवडकर रामभक्तांनी सहभागी होत महाराष्ट्रातील सर्वात मोठी रथयात्रा यशस्वी केली.**






राम जन्मभूमी अयोध्येतील श्रीराम मंदिर राष्ट्रार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने रविवारी सायंकाळी भव्य ‘रथयात्रा’ आयोजित केली होती. त्याला रामभक्त, हिंदू बांधवांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जन्मभूमी अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराचे राष्ट्रार्पण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा होणार आहे. त्यासाठी देशभरामध्ये उत्सवाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. पिंपरी-चिंचवडमध्येही गेल्या सात दिवसांपासून आमदार लांडगे यांनी विविध धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. निगडी येथील भक्ती-शक्ती चौक येथून रथ यात्रेला सुरूवात झाली. हजारो दुचाकी व चारचाकी, चार विजयरथ, राम मंदिर प्रतिकृती, मर्दानी खेळ, डी.जे. ढोल पथक, झांज पथक, श्रीराम जिवंत देखावा, गंगा आरती, सनई चौघडे, महाबली हनुमान, कलश यात्रा, आतिषबाजी यासह हिंदू धर्माबाबत जागृती करण्यासाठी विविध देखावे सादर करण्यात आले.

### आमदार लांडगे यांचा पायी प्रवास...

निगडी ते चिखली या रथ यात्रेच्या मार्गावर हजारो दुचाकी व चारचाकी सहभागी झाल्या. तसेच, रथ यात्रेच्या दोन्ही बाजुंनी सहभागी होत नागरिक, रामभक्त सहभागी झाले. पायी चालणाऱ्या रामभक्तांसोबत आमदार महेश लांडगे यांनी निगडी ते चिखली रामायण मैदानापर्यंत पायी प्रवास केला. तसेच, कारसेवक नंदकुमार सातुर्डेकर व सहकाऱ्यांची राम रथामध्ये मिरवणूक काढण्यात आली. नागरिकांनी दोन्ही बाजुंनी फुलांचा वर्षाव करीत रथ यात्रेचे स्वागत केले. पोलिसांनी चोख बंदोबस्त केला आणि वाहतुकीचे अचूक नियोजन केले.

> श्रीक्षेत्र अयोध्या येथील प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिरात होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा हा तमाम हिंदू बांधवांच्या आणि भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. हिंदूत्व आणि अखंड भारताचा दुवा असलेले श्रीराम मंदिर हे यापुढील हजारो पिंढ्यांसाठी प्रेरणादायी राहणार आहे. या मंगलमय सोहळ्यानिमित्त पिंपरी-चिंचवड अगदी राममय झाले आहे. तमाम भारतवासीयांना या ऐतिहासिक सोहळ्यासाठी हार्दिक शुभेच्छा देतो. मनामनात राम असावा... घराघरांत उत्सव साजरा करावा... असे आवाहन करतो.
>
> **-महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# हजारो रामभक्तांचे सामूहिक रामरक्षा पठण

## अयोध्या मंदिर प्राणप्रतिष्ठा निमित्त भाजपाचे विविध कार्यक्रम

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अयोध्येत २२ जानेवारी रोजी होत असलेल्या प्रभू राम मंदिर प्रतिष्ठापना सोहळा होत आहे. त्यानिमित्त पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे अध्यक्ष शंकर जगताप आणि पिंपरी-चिंचवड शहर संस्कृती संवर्धन व विकास महासंघ यांच्या वतीने चिंचवड, केशवनगर येथे सामूहिक श्री रामरक्षा स्त्रोत पठण घेण्यात आले. त्यामध्ये पिंपरी-चिंचवडमधील शेकडो रामभक्तांनी व विद्यार्थ्यांनी सामूहिक रामरक्षा स्त्रोत पठण केले. या धार्मिक सोहळ्यात रामभक्तांनी श्रद्धापूर्वक व आत्यंतिक उत्साहाने भाग घेतला. त्यामुळे सगळीकडे रामनामाची चैतन्य गंगा वाहत होती.**




चिंचवडगाव, केशवनगर येथील श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी क्रीडांगण येथे हा उपक्रम पार पडला. या सोहळ्याला प्रसिद्ध निवेदक व अभिनेते राहुल सोलापूरकर, पद्मश्री गिरीश प्रभुणे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, संस्कृती संवर्धन व विकास महासंघाचे अध्यक्ष हभप किसन महाराज चौधरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल, जिल्हा कार्यवाह माहेश्वर मराठे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री धनंजय गावडे आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल सोलापूरकर म्हणाले, "अयोध्येचा इतिहास फार जुना आहे. अनेक मुस्लिम राजांनी अयोध्येवर आक्रमणे केली. रामजन्मभूमीसाठी इसवी सनपूर्व १५० पासून ८९ लाढाया झाल्या आहेत. साडेचार लाख रामभक्तांनी बलिदान दिलेले आहे. यावेळी विनोद बन्सल यांनीही मनोगत व्यक्त केले. सोहळ्याचे सूत्रसंचालन नाना शिवले यांनी केले.

> "पिंपरी-चिंचवडमधील ३ हजार मंदिराममध्ये रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे जल्लोषात व आनंदात स्वागत केले जाणार आहे. आतापर्यंत शहरातील सुमारे सात लाख घरांपर्यंत मंगल अक्षतांचे वाटप करण्यात आले आहे. श्री रामरक्षा हे अद्भुत स्त्रोत आहे. त्यात राम शब्द वेगवेगळ्या व्याकरणीय पद्धतीने साधारणपणे ७७ वेळा येतो. विष्णू सहस्त्रनाम म्हटल्याचे पुण्य एकदा रामरक्षा म्हटल्याने मिळते. याच उदात्त उद्देशाने प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरणी एकत्र येऊन रामरक्षा स्त्रोत पठण सोहळा आयोजित केला.
>
> **- शंकर जगताप,**
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड..



## भूमिका

**खासगी शिकवण्यांचा उच्छाद थांबवण्यासाठी केंद्र सरकारने लागू केलेल्या नव्या नियमावलीचा योग्य परिणाम आधीच अभ्यासाच्या, स्पर्धेच्या आणि पालकांच्या इच्छा-आकांक्षांना कंटाळलेल्या मुलामुलींना कितपत होईल, याबद्दल शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती आहे. शिक्षणाचे खासगीकरण होऊ लागल्यानंतरच्या काळात शिकवण्याचे औद्योगिकीकरण होऊ लागले.**

# खासगी शिकवण्यांना चाप बसेल?

अवाच्या सवा शुल्क, अशक्य वाटणारी पण भुरळ घालणारी आश्वासने यामुळे पालक आपल्या पाल्यांना खुंटीवर अडकवल्यासारखे खासगी शिकवणी वर्गात अडकवून टाकतात. शाळेचा गृहपाठ एकवेळ केला नाही तरी चालेल, पण शिकवणी वर्ग बुडता कामा नये, अशा पालकांच्या हट्टापायी, या मुलांचे बालपण करपू लागले आहे, हे खरे. मात्र शालेय शिक्षणाच्या दर्जाचा विचार केला, तर सध्याच्या स्पर्धेच्या काळात मुलांनी टिकून राहायचे असेल, तर फक्त शाळेतील अभ्यासावर अवलंबून राहता येणार नाही, असे पालकांचे म्हणणे असते. प्रत्यक्षात पोटाला चिमटा घेऊन मुलांना शाळेबरोबरच शिकवण्या लावण्याची खरेच गरज असते का, याचा विचार करण्याची सदसद्विवेकबुद्धी हळूहळू नष्ट होत चालली की काय, असे वाटण्याजोगे सध्याचे वातावरण आहे. शाळेचे सहा तास झाल्यानंतर या शिकवणी




वर्गात जाऊन पुन्हा शिकण्याने या मुलांच्या मेंदूवर किती ताण येत असेल, याचा विचार करण्याची आवश्यकता कुणाला वाटत नाही. खासगी शिकवणी वर्ग हा एक स्वतंत्र भरभराटीचा व्यवसाय असल्याने, कमीत कमी जागेत अधिकाधिक मुलांचा भरणा करून त्यांच्याकडून घोकंपट्टी करून घेणे आणि परीक्षा नामक राक्षसाला नामोहरम करण्याची शक्ती मुलांमध्ये निर्माण करणे, एवढेच ध्येय समोर ठेवून हे वर्ग चालवले जातात. मग ना सुटी, ना वेळेचे भान, अशा चक्रात सापडलेल्या पाल्यांची दुर्दशा काय वर्णावी! शाळेत विषय न समजलेल्या तथाकथित 'ढ' मुलांना घरी बोलावून पुन्हा शिकवणारे 'चितळे मास्तर' आता दिसत नाहीत.

गुणांचा पाऊस हाच धोशा असल्याने, अभ्यासक्रम पुरा करण्याची शिक्षकांची धडपड केविलवाणी असते. शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी जे करायला हवे, ते करण्यासाठी सरकारी शिक्षण खाते सक्षम नाही, हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. मुळात शिक्षण हा अनुत्पादक विषय असल्याने, त्यावर अधिक खर्च करण्यास केंद्र आणि राज्य सरकार तयार नसते. त्यातूनच शिक्षणव्यवस्थेचे खासगीकरण करून सरकारवरील अनुदानाचा आर्थिक भार कमी करण्यासाठी नवनवीन धोरणे आखली जात आहेत. याचा अर्थ असाही नव्हे की, खासगी शिकवणी वर्गातील शिक्षणव्यवस्था आदर्शवत असते. मात्र पुन्हा पुन्हा घोटून घेण्याने गुणांच्या शर्यतीत मुले टिकून राहतील, असा बावळट गैरसमज पसरवण्यात शिकवणी वर्गाचे संचालक तरबेज असतात. त्यामुळेच परीक्षेत सर्वाधिक गुण असलेले विद्यार्थी आपल्याच शिकवणी वर्गात शिकल्याची जाहिरातबाजी सुरू होते. अनेकदा एकच विद्यार्थी एकाहून अधिक शिकवणी वर्गाच्या जाहिरातीतही झळकतो, तेव्हा त्याचे गौडबंगाल समजून घेण्याची आवश्यकता पालकांना वाटत नाही. मुलांचे मित्र ज्या शिकवणीला जातात, तेथेच जाण्याच्या मुलांच्या हट्टालाही पालकांना बळी पडावे लागते. हे सगळे जाहिरातबाजीचे परिणाम असतात. वयाच्या सोळा वर्षांपर्यंत शिकवणी वर्ग घेता येणार नाही, हा सरकारचा नवा नियम व्यवहार्य ठरेल की कागदावरच राहील याबद्दल शंका यावी अशी स्थिती आहे.मुलांचा सर्वांगीण विकास हे नव्या शैक्षणिक धोरणाचा गाभा आहे, परंतु तो प्रत्यक्षात यायचा असेल, तर विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाबरोबरच अन्य विषय शिकण्याची सुविधा उपलब्ध असायला हवी. क्रीडा आणि संगीत या विषयातील शिक्षकांच्या भरतीला लाल कंदील दाखवत शाळांनी लोकवर्गणीतून असे शिक्षक नेमावेत, असा बिनडोक विचार करणाऱ्या सरकारी बाबूंना शिक्षण कशाशी खातात, हे समजणे अवघड आहे. खासगी शिकवणी वर्ग ही शालेय शिक्षणासाठी समांतर व्यवस्था असू शकत नाही. असता कामा नये. प्रत्यक्षात मात्र चित्र उलटे आहे. शाळेपेक्षा या वर्गाचेच स्तोम अधिक दिसते. ते कमी करण्यासाठी शालेय शिक्षणाच्या दर्जाची चिंता बाळगणे जेवढे महत्त्वाचे, तेवढेच या वर्गाच्या दर्जाबद्दलही कठोर कारवाईचा बडगा उचलण्याची यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे.

## संपादकीय »

# कछु भाषौ भाई


***आज २२ जानेवारीस अयोध्येत श्रीराम मंदिराचा उद्‌घाटन सोहळा. यानिमित्ताने एकंदरच सर्वत्र हिंदू सश्रद्धांच्या आनंदास उधाण आलेले आहे आणि अनेकांच्या मनात स्वप्नपूर्तीची भावना आहे.***

आज २२ जानेवारीस अयोध्येत श्रीराम मंदिराचा उद्‌घाटन सोहळा. यानिमित्ताने एकंदरच सर्वत्र हिंदू सश्रद्धांच्या आनंदास उधाण आलेले आहे आणि अनेकांच्या मनात स्वप्नपूर्तीची भावना आहे. या स्वप्नपूर्तीच्या श्रेयाचे मानकरी या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याही मनात कृतकृत्यतेची भावना दाटून आली असणार. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यामुळे भाजपची तीन प्रमुख स्वप्ने होती. जम्मू-काश्मिरातून अनुच्छेद ३७० चे उच्चाटन, राम मंदिराची उभारणी आणि समान नागरी कायदा. यातील पहिल्या दोनांची पूर्तता मोदी यांच्या हस्ते झाली आणि तिसऱ्यासही ते निर्विवाद हात घालतील. संघाच्या आणि म्हणून भाजपच्याही विरोधकांस हे सगळे व्यर्थ, निरुपयोगी आणि भावना उद्दीपित करणारे वाटू शकेल. त्यांनी तसे वाटून घेण्यात अगदीच तथ्य नाही असे नाही.

**गेल्या जवळजवळ दीड शतकाचा आपल्या भारताचा इतिहास हा आक्रमकांशी सतत संघर्षांचा आहे. सुरुवातीच्या आक्रमणांचा उद्देश लुटालूट व कधीकधी राज्यसत्ता हडपण्यासाठी एवढाच असे. परंतु इस्लामच्या नावाखाली पश्चिमेकडून झालेले आक्रमण हे सर्वंकष विध्वंस व समाजाचे परकीयीकरण घेऊनच आले.**

# शांतता, ऐक्याचा संदेश देणारा दिवस..!

देशीय समाजाचे मनोबल खच्ची करण्याकरता त्यांची श्रद्धास्थाने नष्ट करणे अनिवार्य होते, म्हणून भारतातही परकीय आक्रमकांनी मंदिरे तोडली. त्यांनी तसे एकदा नव्हे तर अनेक वेळा केले. उद्देश हा होता की भारतीय समाजाचे मनोबल नष्ट व्हावे, भारतीय कायमचे दुबळे बनावेत आणि त्यांच्यावर अबाधितपणे राज्य करता यावे. अयोध्येतील श्री राम मंदिराचा विध्वंस याच मनोवृत्तीतून व याच उद्देशाने झाला. आक्रमकांची ही नीती अयोध्येपुरती किंवा एकाच मंदिरापुरती नव्हे तर सर्व जगभर राबवलेली युद्धनीती होती. भारतीय राज्यकर्त्यांनी कधी कोणावर आक्रमण केले नाही. मात्र जगभरातील राज्यकर्त्यांनी आपल्या राज्यविस्तारासाठी आक्रमक होऊन अशी कुकर्मे केली आहेत. परंतु भारतीय जनतेवर याचा जो परिणाम त्यांना अपेक्षित होता तो झाला नाही. समाज दबला नाही. उलट भारतामध्ये समाजाची जी श्रद्धा व निष्ठा होती, मनोबल होते, ते कधीच कमी झाले



नाही. समाजाकडून प्रतिकाराचा संघर्ष सतत सुरू राहिला त्यामुळे अयोध्येमध्ये जी जन्मस्थळाची जागा आहे ती हस्तगत करून तिथे पुन्हा मंदिर बांधण्याचे वारंवार प्रयत्न करण्यात आले. त्याकरिता अनेक लढाया झाल्या, संघर्ष झाले, बलिदान झाले. हिंदूंच्या मनामध्ये रामजन्मभूमीच्या मुक्तीचा मुद्दा सतत कायम होता.अठराशे सत्तावनमध्ये ब्रिटिश परकीय सत्तेविरुद्ध जेव्हा युद्धाची योजना बनू लागली तेव्हा अयोध्येतील हिंदी व मुसलमानांनी एकत्र येऊन लढण्याकरता, परस्पर विचारविनिमयातून गोहत्याबंदी आणि रामजन्मभूमी मुक्ती या मुद्द्यांवर समेट घडवून आणला. बहादूरशहा जफर यांनी गोहत्या बंदीचा आपल्या घोषणापत्रात समावेश केला होता. समाज एकच होऊन लढला परंतु भारत परतंत्रच राहिला. 'फोडा आणि राज्य करा' या ब्रिटिशांच्या राजनीतीनुसार हिंदी-मुसलमानांची, या आधी घडत आलेली व या देशाच्या स्वभावानुसार अधिकाधिक घट्ट होत चाललेली, एकता भंग करण्याकरता ब्रिटिशांनी अयोध्येतील संघर्षांच्या नायकांना फासावर चढवले व रामजन्मभूमीच्या मुक्तीचा प्रश्न तसाच राहिला. राम मंदिरासाठीचा संघर्षही चालत राहिला.१९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर, सर्वसंमतीने सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार झाला तेव्हाच अशा मंदिरांसंबंधी चर्चा सुरू झाली होती. रामजन्मभूमीच्या मुक्तीबाबत अशा सर्व सहमतीचा विचार करता आला असता. परंतु राजकारणाची दिशा बदलली. भेदाभेद, लांगूलचालन अशा प्रकारच्या स्वार्थी राजकारणाचे स्वरूप प्रचलित होऊ लागले. आणि, त्यामुळे हा प्रश्न कायमच राहिला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदेंसह त्यांच्या सर्व आमदारांना नोटीस!

## » विधानसभाध्यक्षांना न्यायालयाने नोटीस दिलेली नाही

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभाध्यक्षांच्या निकालाला आव्हान देणाऱ्या ठाकरे गटाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आज पहिली सुनावणी झाली. यात न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि 40 आमदारांना नोटीस बजावली आहे. विधानसभाध्यक्षांना मात्र ठाकरे गटाने प्रतिवादी केलेले नसल्याने न्यायालयाने त्यांना नोटीस दिलेली नाही. पुढील सुनावणी पंधरा दिवसांनी होईल.



सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड, न्यायाधीश जे. बी. पारडीवाला आणि न्यायाधीश मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर आजची सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या पुढच्या सुनावणीत एकनाथ शिंदेंना सर्वोच्च न्यायालयाकडे त्यांचे म्हणणे सादर करावे लागणार आहे. या सुनावणी दरम्यान, न्यायालय एकनाथ शिंदेंची बाजू ऐकून घेईल. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात पाठवावे किंवा उच्च न्यायालयातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयात घ्यावे यावर निर्णय होऊ शकेल. यासंदर्भातली पुढची सुनावणी 15 दिवसांनी होणार असली तरी न्यायालयाचे वेळापत्रक आल्यानंतरच निश्चित तारीख कळू शकेल.शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांनी 10 जानेवारीला निकाल दिला. या निकालात त्यांनी कोणत्याही बाजूच्या आमदारांना अपात्र ठरविले नसल्याने ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात तर शिंदे गटाने उच्च न्यायालयात या निकालाला आव्हान दिले आहे.

दरम्यान, शिंदे गटाने दाखल केलेल्या याचिकेवरुन उच्च न्यायालयाने या प्रकरणावर विधानसभा अध्यक्षांसह ठाकरे गटाला आधीच नोटीस जारी केली आहे. तिथेही या दोन्ही बाजूंना उपस्थित राहावे लागणार आहे. उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी 8 फेब्रुवारीला होणार आहे. केंद्र सरकारने 22 जानेवारीला राम मंदिर प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमासंदर्भात अर्धा दिवस सुट्टीची अधिसूचना काढली होती. त्यात सर्वोच्च न्यायालयाचाही उल्लेख होता. तसेच सर्वोच्च न्यायालयासह देशातील सर्व न्यायालयांना सुट्टी देण्यात यावी, अशी विनंती बार कौन्सिलने सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांच्याकडेही केली आहे.

मात्र सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज नियमीत स्वरुपात चालले. दरम्यान, ठाकरे गटाच्या याचिकेवर आधी सकाळच्या सुमारास सुनावणी होणार होती. मात्र काही कारणास्तव ती पुढे ढकलली. दुपारी चारपर्यंत ही सुनावणी झाली नव्हती. त्यामुळे सुनावणी होणार की नाही याबद्दल साशंकता होती. मात्र दुपारी चारच्या पुढे ही सुनावणी पार पडली.सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड, न्यायाधीश जे. बी. पारडीवाला आणि न्यायाधीश मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर आजची सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या पुढच्या सुनावणीत एकनाथ शिंदेंना सर्वोच्च न्यायालयाकडे त्यांचे म्हणणे सादर करावे लागणार आहे.

या सुनावणी दरम्यान, न्यायालय एकनाथ शिंदेंची बाजू ऐकून घेईल. त्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात पाठवावे किंवा उच्च न्यायालयातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयात घ्यावे यावर निर्णय होऊ शकेया निकालात त्यांनी कोणत्याही बाजूच्या आमदारांना अपात्र ठरविले नसल्याने ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात तर शिंदे गटाने उच्च न्यायालयात या निकालाला आव्हान दिले आहे.

### 8 फेब्रुवारीला होणार सुनावणी

» दरम्यान, शिंदे गटाने दाखल केलेल्या याचिकेवरुन उच्च न्यायालयाने या प्रकरणावर विधानसभा अध्यक्षांसह ठाकरे गटाला आधीच नोटीस जारी केली आहे. तिथेही या दोन्ही बाजूंना उपस्थित राहावे लागणार आहे. उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी 8 फेब्रुवारीला होणार आहे. केंद्र सरकारने 22 जानेवारीला राम मंदिर प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमासंदर्भात अर्धा दिवस सुट्टीची अधिसूचना काढली होती. त्यात सर्वोच्च न्यायालयाचाही उल्लेख होता. तसेच सर्वोच्च न्यायालयासह देशातील सर्व न्यायालयांना सुट्टी देण्यात यावी, अशी विनंती बार कौन्सिलने सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांच्याकडेही केली आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज नियमीत स्वरुपात चालले. दरम्यान, ठाकरे गटाच्या याचिकेवर आधी सकाळच्या सुमारास सुनावणी होणार होती. मात्र काही कारणास्तव ती पुढे ढकलली. आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभाध्यक्षांच्या निकालाला आव्हान देणाऱ्या ठाकरे गटाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आज पहिली सुनावणी झाली. यात न्यायालयाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि 40 आमदारांना नोटीस बजावली आहे. विधानसभाध्यक्षांना मात्र ठाकरे गटाने प्रतिवादी केलेले नसल्याने न्यायालयाने त्यांना नोटीस दिलेली नाही.

# ज्यांनी आंबेडकरांना मंदिर प्रवेश नाकारला, तेच आज सत्तेत

## » राहुल गांधींना त्यांनीच मंदिर प्रवेश नाकारला : नाना पटोले

। मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज

भारत जोडो यात्रेला ईशान्य भारतात प्रचंड जनसमर्थन मिळत आहे. यात्रेला मिळत असलेला जनतेचा प्रतिसाद पाहून भारतीय जनता पक्ष घाबरला असून या भितीतून भारत जोडो न्याय यात्रेवर भ्याड हल्ले करण्यात येत आहेत. आज राहुल गांधी आसामममधील मंदिरात दर्शन करण्यास जात असताना त्यांना मंदिरात जाऊ दिले नाही.

मंदिरात जाण्यास आता भाजपाची परवानगी घ्यावी लागणार आहे का? असा संतप्त सवाल करत मंदिरात जाण्यापासून रोखण्याचे कृत्य सत्तेचा अहंकार व मग्रुरीचा प्रकार आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष नाना पटोले यांनी केली.एकीकडे देशात रामलल्लांची प्राण प्रतिष्ठा केली जात असताना दुसरीकडे मात्र मंदिरात जाऊन दर्शन घेण्यापासून रोखणे हे अत्यंत चुकीचे आहे. राहुल गांधी यांना दर्शनापासून रोखणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या सरकारचा निषेध करू तेवढा कमी आहे. प्रभू रामाने कधी कोणाचा द्वेष केला नाही, हिंसेचा मार्ग अवलंबला नाही. मंदिरात प्रवेश नाकारणे, हल्ला करणे ही प्रभू श्रीरामाची शिकवण नाही पण भाजपा रामाच्या नावावर फक्त राजकारण करत आहे, असं नाना पटोले.



राहुल गांधींना आज मंदिर प्रवेश नाकारणाऱ्या लोकांनीच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्यापासून रोखले होते. मंदिर प्रवेशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मोठे आंदोलन करावे लागले होते आणि ह्याच प्रवृत्तीचे लोक आज सत्तेत आहे, असं नाना म्हणाले.भारत जोडो यात्रेवर होत असलेले भ्याड हल्ले पाहता 'चलो आसाम' म्हणत मोठ्या संख्येने आसामकडे जाण्यास तयार होतो पण वरिष्ठ नेत्यांनी असे करण्यापासून रोखले. काँग्रेस अहिंसा व सत्याच्या मार्गानेच आपला प्रवास सुरु ठेवणार आहे असे सांगण्यात आले. यात्रेमध्ये सातत्याने अडथळे निर्माण करणे, यात्रेच्या ताफ्यावर हल्ले करणे असे प्रकार सत्तेचा माज दाखवतात. भाजपाचा हा सत्तेचा माज जनताच उरवेल, असेही नाना पटोले म्हणाले.त्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, रामाचे दर्शन घेण्यापासून किंवा अयोध्येला जाण्यापासून कोणालाही रोखलेले नाही. भाजपा प्राण प्रतिष्ठेचा राजकीय मुद्दा बनवत आहे तसेच काँग्रेसने राम मंदिराला कधीही विरोध केला नाही.

### भारतीय जनता पक्ष घाबरला

» वास्तविक पाहता तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनीच राम मंदिराचे कुलूप काढून दर्शन सुरु केले. शिलान्यासही केला. अयोध्येत राम मंदिर बांधण्याचा मार्गही काँग्रेस सरकार असतानाचा काढण्यास आला होता, असेही पटोले म्हणाले.भारत जोडो यात्रेला ईशान्य भारतात प्रचंड जनसमर्थन मिळत आहे. यात्रेला मिळत असलेला जनतेचा प्रतिसाद पाहून भारतीय जनता पक्ष घाबरला असून या भितीतून भारत जोडो न्याय यात्रेवर भ्याड हल्ले करण्यात येत आहेत.

# शतकानुशतकांच्या प्रतीक्षेनंतर राम आले!

## 22 जानेवारी 2024 चा सूर्य एक तेजस्वी प्रकाश घेऊन आलाय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**२२ जानेवारी २०२४ चा सूर्य एक तेजस्वी प्रकाश घेऊन आला आहे. ही कॅलेंडरवर लिहिलेली तारीख नाही, तर ती काळाच्या नवीन चक्राची उत्पत्ती आहे. आमचे रामलल्ला आता तंबूत राहणार नाही. ते आता या दिव्य मंदिरात राहणार आहेत, अशा भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर बोलताना व्यक्त केला.**





माझा ठाम विश्वास आणि अपार श्रद्धा आहे की, जे काही घडले आहे, त्याची अनुभूती देशाच्या आणि जगाच्या कानाकोपऱ्यातील रामभक्तांना नक्कीच होत आहे. शतकानुशतकांच्या प्रतीक्षेनंतर आपले राम आले आहेत. शतकानुशतके अभूतपूर्व धैर्य, अगणित बलिदान, त्याग आणि तपश्चर्येनंतर आपल्या प्रभूरामांचे आगमन झाले आहे. या शुभप्रसंगी तुम्हा सर्वांना आणि तमाम देशवासियांना हार्दिक शुभेच्छा. मी गर्भगृहात दैवी चैतन्याचा साक्षीदार बनूव तुमच्यासमोर उपस्थित आहे. सांगण्यासारखे बरेच काही आहे, पण कंठ दाटून येतो, मन भरून आले आहे. आमचे रामलल्ला आता तंबूत राहणार नाही. आमचे रामलल्ला आता दिव्य मंदिरात राहणार आहेत. हा क्षण अलौकिक आहे. हा क्षण सर्वात पवित्र आहे. हे वातावरण, ह्या क्षणी आपल्या सर्वांवर प्रभू श्रीरामांचा आशीर्वाद आहे, असे पीएम मोदी म्हणाले. आजचा हा प्रसंग केवळ उत्सवाचा क्षण नाही तर त्याचबरोबर भारतीय समाजाच्या परिपक्वतेची जाणीव करून देणाराही क्षण आहे. आमच्यासाठी हा केवळ विजयाचा नाही तर नम्रतेचाही क्षण आहे. रामलल्लांच्या मंदिराची उभारणी भारतीय समाजाच्या शांतता, संयम, परस्पर सौहार्द आणि समन्वयाचे प्रतीक आहे. हे मंदिर कोणत्याही आगीला नाही तर उर्जेला जन्म देत आहे. राम अग्नी नाही, राम ऊर्जा आहेत. राम वाद नाही, राम समाधान आहे. राम फक्त आमचे नाहीत, राम सर्वांचे आहेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.भारताच्या संविधानाच्या पहिल्या प्रतीमध्ये भगवान राम आहेत. संविधान अस्तित्वात आल्यानंतरही भगवान श्रीरामाच्या अस्तित्वावरून अनेक दशके कायदेशीर लढाई सुरूच होती. न्यायाची प्रतिष्ठा जपणाऱ्या भारतीय न्यायव्यवस्थेबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो, असे पीएम मोदींनी नमूद केले. आज प्रत्येक गावात एकाच वेळी कीर्तन होत आहे. आज मंदिरांमध्ये उत्सव होत आहेत, स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. संपूर्ण देश आज दिवाळी साजरी करत आहे. प्रभू राम भारताच्या आत्म्याच्या प्रत्येक कणाशी जोडलेले आहेत. राम भारतीयांच्या अंतर्मनात वास करतात. गुलामगिरीची मानसिकता झुगारून उभे राहणारे राष्ट्र, भूतकाळाच्या प्रत्येक दंशातून हिंमत घेणारे राष्ट्र अशा प्रकारे नवा इतिहास घडवते. आजपासून हजार वर्षांनंतरही लोक या तारखेबद्दल, या क्षणाबद्दल चर्चा करतील, असेही ते म्हणाले. अयोध्येत आज सोमवारी (दि.२२) 'न भूतो न भविष्यती' असा सोहळा पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दुपारी अभिजित मुहूर्तावर अयोध्येत श्री रामलल्लांचा प्राणप्रतिष्ठा विधी संपन्न झाला अन् भगवान श्रीराम अयोध्येतील भव्य आणि दिव्य मंदिरात विराजमान झाले. डोळ्यावरून पट्टी काढण्यात आल्यानंतर श्री रामलल्लांचे मूखदर्शन सर्वांना घडले. यावेळी पीएम मोदींनी रामलल्लांसमोर साष्टांग दंडवत घातला. अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिरातील 'प्राणप्रतिष्ठा' सोहळ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ११ दिवसांचा उपवास सोडला.पीएम मोदी पुढे म्हणाले की, हे रामाच्या रूपातील राष्ट्रीय चैतन्याचे मंदिर आहे. राम आधार आहे. राम ही भारताचा विचार आहे. राम प्रवाह आहे. राम नीतीही आहे. राम सर्वव्यापी आहे. राम चैतन्य आहे. राम चिंतन आहे. राम वर्तमान आहे. राम अनादी अनंत आहे.यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सरसंघचालक मोहन भागवत, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि अन्य उपस्थित होते.यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या भाषणाची सुरुवात जय रामल्ला भगवान की जय, भारत माता की जय आणि जय जय सीताराम म्हणत केली.

### प्रत्येक मनात रामनाम आहे

ते म्हणाले की मन भावूक आहे. भावनेने भारावून गेलेले आहे. आनंद व्यक्त करण्यासाठी शब्द नाहीत. प्राणप्रतिष्ठेबद्दल सर्वांचे अभिनंदन. भारताचा प्रत्येक मार्ग रामजन्मभूमीकडे येत आहे. जिथे मंदिर बांधण्याचा संकल्प केला होता तिथेच मंदिर उभारले आहे. बहुसंख्यांक समाजाने यासाठी दीर्घ काळ लढा दिला. "भगवान रामलल्ला भव्य, दिव्य आणि नव्या निवासस्थानात विराजमान झाल्याबद्दल तुम्हा सर्वांचे कोटी- कोटी मनःपूर्वक अभिनंदन. आज या ऐतिहासिक प्रसंगी, भारत प्रत्येक शहर, प्रत्येक गाव अयोध्यावासी आहे. प्रत्येक मनात रामनाम आहे.

# रामाचा जयजयकार; सीता मातेचा विसर

## भाजपा महिला विरोधी; ममता बॅनर्जींची टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर भाजपावर जोरदार टीका केली. लोकसभा निवडणुकीच्या आधी एका धार्मिक कार्यक्रमाचे भाजपाकडून राजकारण करण्यात येत आहे. तसेच भाजपा पक्ष महिला विरोधी आहे, असेही ममता बॅनर्जी म्हणाल्या. राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहण्याऐवजी ममता बॅनर्जी यांनी आज 'संहती मोर्चा' काढला. संहती म्हणजे सर्व धर्मांना एकच मानने. या मोर्चातून ममता बॅनर्जी यांनी सर्वधर्म समभावाचा संदेश दिला.**





तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला हजेरी लावली नसली तरी त्यांनी भाजपावर निशाणा साधला. भाजपाने प्रभू श्रीरामाचा जयजयकार करत असताना सीतामाताला मात्र बाजूला सारले, अशी टीका त्यांनी केली.ममता बॅनर्जी म्हणाल्या, "ते (भाजपा) प्रभू श्रीरामाबद्दल बोलत आहेत. मात्र सीतामातेचा विषयी काहीच का बोलले जात नाही? प्रभू श्रीरामासह त्याही वनवासात गेल्या होत्या. हे लोक महिला विरोधी असल्यामुळेच सीतामातेबद्दल अवाक्षर काढत नाहीत.

आम्ही दुर्गामातेला पूजणारे लोक आहोत, त्यामुळे त्यांनी आम्हाला धर्माबद्दल शिकवण देण्याचा प्रयत्न करू नये." "निवडणुकीच्या आधी धर्माचा राजकारणासाठी वापर करण्यावर माझा विश्वास नाही. प्रभू श्रीरामाची भक्ती करण्याला माझा अजिबात विरोध नाही. पण भक्तीच्या आडून लोकांच्या आहारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे किंवा त्यावर निर्बंध आणणे, याला माझा विरोध आहे", असेही ममता बॅनर्जी संहती मोर्चादरम्यान बोलल्या. "तृणमूलच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी धर्मा-धर्मात सौहार्द निर्माण व्हावा, यासाठी हा मोर्चा काढल्याचे सांगितले जाते.

कोलकात्यात काढलेल्या या मोर्चाला विविध धर्माचे प्रतिनिधी उपस्थित होते. अयोध्येत होत असलेल्या राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला प्रत्युत्तर म्हणून हा मोर्चा काढलेला नाही", असेही ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केले.तृणमूल काँग्रेसचे युवा नेते अभिषेक बॅनर्जी या मोर्चाबद्दल बोलताना म्हणाले, "बंगालसाठी आज अभिमानाचा दिवस आहे.

# राम मंदिरप्राणप्रतिष्ठेनंतर पाकिस्तानचा जळफळाट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होताच देशभरात जल्लोष साजरा करण्यात आला. अनेक मंदिरांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले, अनेक ठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या. देशात एक आनंदाचे वातावरण तयार झालेले पाहायला मिळाले. मात्र आपल्या शेजारी राष्ट्राला ही बाब रुचलेली नाही. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या काही तासांनंतर पाकिस्तानने या सोहळ्याचा निषेध केला आहे.पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून एक्सवर प्रसिद्धी पत्रक शेअर करण्यात आले आहे. "भारतामधील अयोध्या शहरातील बाबरी मशीद पाडून त्याठिकाणी बांधण्यात आलेल्या राम मंदिराचा आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आम्ही निषेध करतो", असे या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. अयोध्येत मशिदीच्या जागेवर मंदिर बांधल्यामुळे भारताच्या लोकशाही चेहऱ्याला एक काळा डाग लागला आहे. विशेष म्हणजे, यानंतर आता वाराणसीतील ज्ञानवापी मशीद आणि मुथरेतील शाही ईदगाह मशिदीचाही आता नंबर लागणार असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे ही यादी वाढतच जात आहे. या मशिदींनाही विनाशाचा सामना करावा लागलणार आहे", असेही या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. गेल्या ३१ वर्षांतील घडामोडी आणि आजच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याकडे पाहिले तर भारतातील वाढत्या बहुसंख्यांकवादाचे हे सूचक उदाहरण दिसत आहे. यातून भारतातील मुस्लिमांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात उपेक्षित ठेवण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे", असे या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# गौतमीसाठी 'पाहुणं जेवला काय '?

पुण्याच्या वालचंद नगर भागातील मध्यमवर्गीय कुटुंबातील राधा तिच्या आवाजाने सध्या चर्चेत आहे. प्रतिकूल परिस्थितीत मात करत तिने आपल्या आवाजाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.' सुर नवा ध्यास नवा ' या कार्यक्रमाच्या निमित्ताने राधा महाराष्ट्रात पुढे आले. ती या कार्यक्रमात उपविजेती ठरल्यानंतर मागे वळून न पाहता तिनं गायन क्षेत्रात काम सुरू ठेवलं. पाटलांचा बैलगाडा, पाहूनं जेवला काय ? ही तिने गायलेली गाणी प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर (RADHA KHUDE LATEST NEWS) घेतली. इतकच नाही तर गौतमी पाटील सुद्धा तिच्या या गाण्यांमुळे राज्यभरात धुमाकूळ घालत आहे. मात्र इथपर्यंतचा राधाचा प्रवास सोप्पा नव्हता. तिचे बालपण , संगीत क्षेत्रातला तिचा प्रवास, लव स्टोरी या सगळ्या बाबत तिने सकाळच्या अनप्लग (SAKAL UNPLUGGED PODCAST) पॉडकास्ट मध्ये सविस्तर गप्पा मारल्या आहेत. राधाच्या इथपर्यंतच्या प्रवासाबरोबरच तिची लव स्टोरी सुद्धा तितकीच विशेष आहे.संगीतकार, कवी गोविंद तरडे यांच्यासोबत काम करत असताना गोविंद तरडे गाणं लिहितात आणि राधा आपल्या आवाजाने ते शब्द बोलके करण्याचं काम करते. हेच संगीत प्रेमात उतरलं आणि प्रेम झालं. त्यानंतर आम्ही लग्न केलं, आमचा सुखाचा संसार सुरू असल्याचं राधाने सांगितलं आहे. याबरोबरच इथपर्यंतच्या टप्प्यावर तिला आलेले अनेक अनुभव, तिने सांगितलेला एक प्रसंग खूप काही सांगून जाणारा आहे. ही संपूर्ण मुलाखत ऐकण्यासाठी खाली दिलेल्या लिंक वर लगेचच क्लिक करा.आपल्या आगळ्या वेगळ्या धाटणीच्या गायकीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या राधा खुडेचा चाहतावर्ग मोठा आहे. तिला सोशल मीडियावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. इंस्टावर राधाच्या फोटोंना नेटकऱ्यांची मोठी पसंती मिळताना दिसते. अल्पावधीत स्वताच्या नावाची वेगळी ओळख राधानं तयार केली आहे.

# फायटर'ची प्रदर्शनापूर्वीच मोठी कमाई




सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित बहुचर्चित चित्रपट 'फायटर' २५ जानेवारीला म्हणजेच अवघ्या तीन दिवसांत रीलिज होणार आहे. या चित्रपटात दीपिका पदुकोण, हृतिक रोशन व अनिल कपूर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटासाठी प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. फायटर या चित्रपटाने रीलिज होण्याआधीच बक्कळ कमाई केली आहे. हा चित्रपट हवाई दलावर आधारित असून, तो प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर रीलिज करण्यात येणार आहे. इंडस्ट्री ट्रॅकर सॅकनिल्कनुसार, 'फायटर' चित्रपटाने पहिल्याच दिवशी आगाऊ बुकिंगद्वारे २.८४ कोटी इतकी कमाई केली. पहिल्या दिवसासाठी ८६,५१६ तिकिटांची विक्री झाली. तर टूडी हिंदी व्हर्जनसाठी ३३,६२४ आणि थ्रीडी व्हर्जनसाठी ४६,७९० एवढ्या तिकिटांची विक्री झाली आहे. आयमॅक्स थ्रीडी ॲक्शनसाठी ४,८८१ आणि फोरडीएक्स थ्रीडीसाठी १२२१ तिकिटांची विक्री झाली आहे.प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, या चित्रपटाचे सर्वाधिक आगाऊ तिकीट बुकिंग महाराष्ट्रात झाले आहे. महाराष्ट्रात ७५.०२ लाख रुपयांची तिकिटे विकली गेली आहेत. दिल्लीत ६७.३९ लाख रुपये, तेलंगणात ४०.७३ लाख रुपये व कर्नाटकमध्ये ४३.५४ लाख रुपये तिकिटांची विक्री झाली आहे. भारतीय हवाई दलाच्या कॅडेट्सनी या चित्रपटासाठी काम केले आहे. या चित्रपटात २०१९ पुलवामा हल्ला, २०१९ बालाकोट हवाई हल्ला व २०१९ भारत-पाकिस्तान सीमा चकमकींचा संदर्भ घेण्यात आला आहे. हा चित्रपट हवाई हल्ल्यांवर आधारित असून, दहशतवादी कारवाया हाताळण्यासाठी हवाई मुख्यालय नियुक्त केले जाते.

# अयोध्येत कलाकारांची मांदियाळी!

प्रभू रामचंद्राच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आज (२२ जानेवारी) अयोध्येत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते पार पडली. पंतप्रधानांनी १२ वाजून २९ मिनिटांनी प्राणप्रतिष्ठेला सुरुवात केली. त्यांच्यासह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, सरसंघचालक मोहन भागवतही होते. याशिवाय या सोहळ्यासाठी काही दिग्गज बॉलीवूड कलाकारांनाही आमंत्रित करण्यात आलं होतं. प्रभू रामाच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यासाठी अयोध्येत गेल्या अनेक दिवसांपासून जोरदार तयारी सुरु होती. आज प्राणप्रतिष्ठेसाठी संपूर्ण अयोध्यानगरी सजवण्यात आली होती. आलिया भट्ट, रणबीर कपूर, विकी कौशल, कतरिना कैफ, रोहित शेट्टी, आयुष्मान खुराना, माधुरी दीक्षित व तिचे पती डॉ. श्रीराम नेने हे कलाकार राम मंदिराच्या उद्घाटनासाठी सकाळीच मुंबईतून रवाना झाले होते.

# आलियाच्या लूकचं कौतुक



अयोध्येतील श्री राम मंदिरात आज (२२ जानेवारी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रामल्लाच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहिले होते. बॉलीवूडमधील बहुतांश कलाकारांना या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हायची संधी मिळाली. माधुरी दीक्षित-श्रीराम नेने, विकी कौशल-कतरिना कैफ, आलिया भट्ट-रणबीर कपूर अशा बॉलीवूडच्या लोकप्रिय जोडप्यांना यावेळी निमंत्रित करण्यात आलं होतं. रामल्लाची प्रतिष्ठापना झाल्यावर मंदिर परिसरातील अनेक फोटो सेलिब्रिटींनी सोशल मीडियावर शेअर केले. प्रभू रामाच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यासाठी सगळ्या बॉलीवूड सेलिब्रिटींनी पारंपरिक पोशाख केला होता. रणबीर कपूरने धोतर, तर आलियाने मोरपिशी रंगाची सुंदर अशी साडी नेसली होती. या सोहळ्यासाठी अभिनेत्रीने खास साडीची निवड केली होती.सध्या आलिया भट्टने नेसलेल्या साडीची बॉलीवूडमध्ये सर्वत्र चर्चा रंगली आहे. तिच्या संपूर्ण प्लेन डिझाइन असलेल्या साडीच्या काठावर रामायणासंदर्भातील चित्र रेखाटण्यात आली आहेत.

# आयरा खानने शेअर केला बाबा आमिर खानचा फोटो

आमिर खानची मुलगी आयरा खान आणि फिटनेस ट्रेनर नुपूर शिखरे अलीकडेच विवाहबंधनात अडकले. त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. रविवारी नववधू आयराने तिच्या नोंदणीकृत लग्नातील अनेक फोटो शेअर करत तिच्या भावना व्यक्त केल्या. "प्री वेडिंग कॉफी फिक्स" असे कॅप्शन देत तिने पहिला फोटो शेअर केला. तर "मला नेहमी गांभीर्याने घेतल्याबद्दल धन्यवाद" असे म्हणत माईकसह सराव करतानाचा आणि लग्नातला फोटो तिन स्टोरीवर अपलोड केला. पुढे आमिर खानचा भावनिक फोटो शेअर करत आयराने 'खोटे अश्रू' असं मजेशीर कॅप्शन दिलं.आयराने तिचा प्रियकर आणि सेलिब्रिटी फिटनेस ट्रेनर नुपूर शिखरेशी जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात लग्न केलं. रविवारी (२१ जानेवारी)



आयराने लग्नातील समारंभाचे फोटो आणि व्हिडीओ शेअर करत चाहत्यांना सुखद धक्का दिला. या संपूर्ण समारंभात आयराचे आई-वडील आमिर खान आणि रीना दत्ता तिच्या आनंदात सहभागी झाले होते. आणखी एक फोटो शेअर करत तिने लिहिले, "एवढ्यात गाणी लावायची घाई करू नका... कारण, अजून लग्नाची संपूर्ण प्रक्रिया बाकी आहे."आयरा खानच्या लग्नातील फोटोमध्ये तिच्या आई-वडिलांसह तिचा भाऊ जुनैद आणि बहीण झेन मेरी यांची झलक पाहायला मिळाली. नोंदणीकृत विवाहानंतर, आयरा खान आणि नुपूर शिखरे यांनी ८ जानेवारी रोजी उदयपूरमध्ये पारंपरिक पद्धतीने मित्रमंडळी व नातेवाईकांच्या उपस्थितीत लग्न केलं. राजस्थानमधील ताज लेक पॅलेजमध्ये या दोघांची रिसेप्शन पार्टी पार पडली होती.आमिर खानची मुलगी आयरा खान आणि फिटनेस ट्रेनर नुपूर शिखरे अलीकडेच विवाहबंधनात अडकले. त्यांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाले. रविवारी नववधू आयराने तिच्या नोंदणीकृत लग्नातील अनेक फोटो शेअर करत तिच्या भावना व्यक्त केल्या.

# ग्लेन मॅक्सवेल हॉस्पिटलमध्ये दाखल

## » ग्लेन मॅक्सवेल जास्त काळ हॉस्पिटलमध्ये थांबला नाही

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियन संघाचा स्टार अष्टपैलू खेळाडू ग्लेन मॅक्सवेलबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. २०२३ च्या विश्वचषकाचा हिरो असलेल्या मॅक्सवेलला तात्काळ रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल करावे लागले. याचे कारण कोणताही आजार किंवा दुखापत नसून मद्यपान असल्याचे समोर येत आहे. वास्तविक, पब पार्टीदरम्यान मॅक्सवेलने इतके मद्यपान केले की त्याला हॉस्पिटलमध्ये न्यावे लागले.**



मीडिया रिपोर्ट्सनुसार, ग्लेन मॅक्सवेलची प्रकृती बिघडली होती. ॲडलेडमधील एका पबमध्ये त्यांनी ही पार्टी केली होती. वास्तविक, मॅक्सवेल ॲडलेडमधील एका प्रसिद्ध गोल्फ स्पर्धेत सहभागी झाला होता. यानंतर तो पबमध्ये पोहोचला. ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ब्रेट लीचा बँड सिक्स अँड आऊटही याच पबमध्ये परफॉर्म करत होता. रिपोर्ट्सनुसार, पबमध्ये पार्टीदरम्यान मॅक्सवेलने खूप पार्टी केली. यानंतर त्यांची प्रकृती खूपच बिघडली. त्यानंतर त्याला तातडीने रॉयल ॲडलेडमधील हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. तथापि, मॅक्सवेल जास्त काळ हॉस्पिटलमध्ये थांबला नाही, असेही अहवालात म्हटले आहे. उपचारानंतर काही वेळातच तो परतला म्हणजे तो रात्रभर हॉस्पिटलमध्ये नव्हता. मात्र, या प्रकरणाचे संपूर्ण सत्य अद्याप समोर आलेले नाही. या संपूर्ण प्रकरणाचा तपास अहवालाच्या आधारे सुरू आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया बोर्डाला (सीए) ही बातमी उशिरा कळली. आता या प्रकरणाची चौकशी सुरु झाली आहे.क्रिकेट ऑस्ट्रेलियाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. ईएसपीएनक्रिकइन्फोच्या म्हणण्यानुसार, “क्रिकेट ऑस्ट्रेलियाला ॲडलेडमध्ये ग्लेन मॅक्सवेलच्या आठवड्याच्या शेवटी घडलेल्या घटनेची माहिती आहे आणि ते अधिक माहिती घेत आहेत,” असे सीएने एका निवेदनात म्हटले आहे. मेलबर्न स्टार्स लीग संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार झालेल्या मॅक्सवेलचा ऑस्ट्रेलियाच्या वनडे मालिकेत समावेश न करता त्याला विश्रांती देण्यात आली आहे. त्यामुळे २ ते ६ फेब्रुवारी दरम्यान वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी निवडलेल्या ऑस्ट्रेलियाच्या 13 सदस्यीय संघात समावेश नाही.ग्लेन मॅक्सवेल ऑस्ट्रेलियन संघासोबत सराव शिबिरात सहभागी झाल्याचे वृत्त आहे. कांगारू संघ सध्या वेस्ट इंडिजविरुद्ध दोन सामन्यांची मायदेशात कसोटी मालिका खेळत आहे. ऑस्ट्रेलियाने पहिली कसोटी १० विकेट्सनी जिंकली. तसेच दुसरी कसोटी २५ जानेवारीपासून खेळवली जाणार आहे. यानंतर, दोन्ही संघांमध्ये एकदिवसीय मालिका होणार आहे, ज्यामुळे मॅक्सवेलला वर्कलोड मॅनेजमेंट अंतर्गत विश्रांती देण्यात आली आहे.ग्लेन मॅक्सवेलची प्रकृती बिघडली होती. ॲडलेडमधील एका पबमध्ये त्यांनी ही पार्टी केली होती. वास्तविक, मॅक्सवेल ॲडलेडमधील एका प्रसिद्ध गोल्फ स्पर्धेत सहभागी झाला होता. यानंतर तो पबमध्ये पोहोचला. ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज ब्रेट लीचा बँड सिक्स अँड आऊटही याच पबमध्ये परफॉर्म करत होता. रिपोर्ट्सनुसार, पबमध्ये पार्टीदरम्यान मॅक्सवेलने खूप पार्टी केली. यानंतर त्यांची प्रकृती खूपच बिघडली. त्यानंतर त्याला तातडीने रॉयल ॲडलेडमधील हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.तथापि, मॅक्सवेल जास्त काळ हॉस्पिटलमध्ये थांबला नाही, असेही अहवालात म्हटले आहे. उपचारानंतर काही वेळातच तो परतला म्हणजे तो रात्रभर हॉस्पिटलमध्ये नव्हता. मात्र, या प्रकरणाचे संपूर्ण सत्य अद्याप समोर आलेले नाही. क्रिकेट ऑस्ट्रेलिया बोर्डाला (सीए) ही बातमी उशिरा कळली.क्रिकेट ऑस्ट्रेलियाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. ईएसपीएनक्रिकइन्फोच्या म्हणण्यानुसार, “क्रिकेट ऑस्ट्रेलियाला ॲडलेडमध्ये ग्लेन मॅक्सवेलच्या आठवड्याच्या शेवटी घडलेल्या घटनेची माहिती आहे आणि ते अधिक माहिती घेत आहेत,” असे सीएने एका निवेदनात म्हटले आहे.

### ऑस्ट्रेलियाने पहिली कसोटी जिंकली

» मेलबर्न स्टार्स लीग संघाच्या कर्णधारपदावरून पायउतार झालेल्या मॅक्सवेलचा ऑस्ट्रेलियाच्या वनडे मालिकेत समावेश न करता त्याला विश्रांती देण्यात आली आहे. त्यामुळे २ ते ६ फेब्रुवारी दरम्यान वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी निवडलेल्या ऑस्ट्रेलियाच्या 13 सदस्यीय संघात समावेश नाही.ग्लेन मॅक्सवेल ऑस्ट्रेलियन संघासोबत सराव शिबिरात सहभागी झाल्याचे वृत्त आहे. कांगारू संघ सध्या वेस्ट इंडिजविरुद्ध दोन सामन्यांची मायदेशात कसोटी मालिका खेळत आहे. ऑस्ट्रेलियाने पहिली कसोटी १० विकेट्सनी जिंकली.

# इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतून कोहली बाहेर

## » आता विराट कोहलीच्या जागी कोणत्या खेळाडूला संधी मिळणार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाला २५ जानेवारीपासून इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार आहे. गुरुवारपासून हैदराबादच्या राजीव गांधी स्टेडियमवर पहिला सामना खेळवला जाणार आहे. या सामन्याच्या ३ दिवस आधी टीम इंडियाला मोठा झटका बसला आहे. भारताचा महान फलंदाज विराट कोहलीने पहिल्या दोन कसोटी सामन्यांमधून आपले नाव मागे घेतले आहे. याबाबत बीसीसीआयने माहिती दिली आहे.**

विराट कोहलीने आपले नाव का मागे घेतले याबाबत कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. विराटने वैयक्तिक कारणांमुळे नाव मागे घेतल्याचे बीसीसीआयने आपल्या एक्स पोस्टमध्ये सांगितले आहे. टीम इंडियाचा संघ फक्त पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी जाहीर करण्यात आला होता. आता विराटच्या जागी कोणत्या खेळाडूला संधी मिळणार हे येत्या काही दिवसात स्पष्ट होईल. त्याचबरोबर तिसऱ्या कसोटीत विराट पुनरागमन करतो की नाही, हेही पाहावे लागेल. बीसीसीआयने जारी केलेल्या निवेदनात विराट कोहलीने कर्णधार रोहित शर्मा आणि टीम इंडियाच्या व्यवस्थापनाशी चर्चा केल्याची माहिती देण्यात आली



आहे. देशाचे प्रतिनिधित्व करणे हे त्याचे प्राधान्य असल्याचे विराटने सांगितले असल्याचे बोर्डाने म्हटले आहे. पण सध्या तो अशा वैयक्तिक परिस्थितीत आहे की त्याला माघार घ्यावी लागली. या कारणास्तव तो पहिल्या दोन कसोटींमधून बाहेर असेल. बोर्डाने मीडिया आणि चाहत्यांना विराटच्या गोपनीयतेकडे लक्ष देण्यास सांगितले आहे. बीसीसीआयने अद्याप बदलीची घोषणा केलेली नाही. पण तिलक वर्माची रणजीमधील कामगिरी लक्षात घेता तो टीम इंडियात सामील होऊ शकतो.रोहित शर्मा (कर्णधार), शुबमन गिल, यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), केएस भरत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जसप्रीत बुमराह, आवेश खान.विराट कोहलीने आपले नाव का मागे घेतले याबाबत कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. विराटने वैयक्तिक कारणांमुळे नाव मागे घेतल्याचे बीसीसीआयने आपल्या एक्स पोस्टमध्ये सांगितले आहे. टीम इंडियाचा संघ फक्त पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी जाहीर करण्यात आला होता. आता विराटच्या जागी कोणत्या खेळाडूला संधी मिळणार हे येत्या काही दिवसात स्पष्ट होईल. त्याचबरोबर तिसऱ्या कसोटीत विराट पुनरागमन करतो की नाही, हेही पाहावे लागेल. बीसीसीआयने जारी केलेल्या निवेदनात विराट कोहलीने कर्णधार रोहित शर्मा आणि टीम इंडियाच्या व्यवस्थापनाशी चर्चा केल्याची माहिती देण्यात आली आहे. देशाचे प्रतिनिधित्व करणे हे त्याचे प्राधान्य असल्याचे विराटने सांगितले असल्याचे बोर्डाने म्हटले आहे. पण सध्या तो अशा वैयक्तिक परिस्थितीत आहे .

### विराटने नाव का मागे घेतले?

» आता विराटच्या जागी कोणत्या खेळाडूला संधी मिळणार हे येत्या काही दिवसात स्पष्ट होईल. विराट पुनरागमन करतो की नाही, हेही पाहावे लागेल.बीसीसीआयने जारी केलेल्या निवेदनात विराट कोहलीने कर्णधार रोहित शर्मा आणि टीम इंडियाच्या व्यवस्थापनाशी चर्चा केल्याची माहिती देण्यात आली आहे.